| MHJN020005472013 | नियमित दिवाणी दावा क्र.२२१/२०१३<br>निलावती व इतर वि. शासन व इतर<br>CNRMHJN020005472013 |
| --- | --- |

**<u>निशाणी क्र.६७ वरील आदेश</u>**

वादींनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी व्यवहार संहिताचे आदेश ३९ नियम १ व २ सह कलम १५१ प्रमाणे तात्पुरता मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२) **<u>वादींचे कथन थोडक्यात येणेप्रमाणे</u>** :-

वादींनी मौजे बाजीउम्रद ता. जि. जालना येथील शेतजमीन गट क्र.३०३ व गट क्र.२९१ या मिळकतीबाबत उद्घोषणा व मनाई हुकुम मिळणेसाठी प्रस्तुतचा दावा दाखल केलेला असून तो प्रलंबित आहे. (सदर गट क्र.३०३ व २९१ यास यापुढे संक्षिप्तरीत्या "दावा मिळकत" असे संबोधण्यात येईल.)

३) वादींनी कथन केले आहे की, प्रस्तुतचा दावा दाखल केल्यानंतर प्रतिवादी क्र.६ हौशल्याबाई हिने प्रतिवादी क्र.८ गोरखनाथ यांच्या हक्कात दिनांक ०९/०५/२०१३ रोजी गट क्र.३०३ मधील मिळकतीचे बेकायदेशीर विक्रीपत्र क्र.१६९२/२०१३ नोंदवून दिले. सदरची बाब वादींना माहित झाल्यानंतर वादींनी त्यास प्रतिवादी क्र.८ म्हणून दाव्यात समाविष्ठ केले. सदर प्रतिवादी क्र.८ याने दावा मिळकतीमध्ये अडथळा करु नये. तसेच, सदर मिळकतीचे कोणत्याही प्रकारे हस्तांतर करु नये असा अर्ज निशाणी क्र.३६ वर दिला होता. सदर अर्ज दिनांक २०/०८/२०१५ रोजी मंजूर झाला. सदर आदेशाची माहिती प्रतिवादी क्र.६ हिस असतांनाही त्यांनी प्रतिवादी क्र.९ यास गट क्र.२९१ मधील ८१ आर

जमीन नोंदणीकृत विक्रीपत्राद्वारे नोंदवून दिली. प्रतिवादी क्र.९ यांनी सदर बेकायदेशीर विक्रीपत्राच्या आधारे परस्पर महसुल दप्तरी नोंदवून ७/१२ उताऱ्यावर नोंद करुन घेतली आहे. प्रतिवादी क्र.९ याने सदर जमीन बेकायदेशीररीत्या हस्तांतरीत करण्याच्या धमक्या देत असून दावा मिळकतीमध्ये शांततामय ताब्यात अडथळा करीत आहे. सदर मनाई हुकुम प्रतिवादी क्र.६ यांच्याविरुध्द आहे, असे सबब सांगुन सदर मिळकत विक्री करण्याच्या धमक्या देत आहे. त्याने सदर मिळकत हस्तांतरीत केल्यास दाव्याच्या चौकशीमध्ये गुंतागंत निर्माण होईल. त्यामुळे प्रस्तुतच्या दाव्याचा निकाल लागेपर्यंत सदर मिळकतीचे कोणत्याही प्रकारे हस्तांतर करु नये अथवा कोणत्याही प्रकारचा बोजा लादू नये यासाठी प्रतिवादी क्र.९ विरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकुम पारीत करण्यात यावा अशी विनंती केली.

४) सदर अर्जावर प्रतिवादी क्र.९ तर्फे निशाणी क्र.८२ वर लेखी जबाब व म्हणणे देण्यात आले की, वाद मिळकत गट क्र.२९१ मधील ८१ आर शेतजमीनीचा तो कायदेशीर मालक व ताबेदार आहेत. प्रतिवादी क्र.९ ने सदरील शेतजमीन नोंदणीकृत खरेदीखता आधारे दिनांक २०/०१/२०१७ रोजी प्रतिवादी क्र.६ यांच्याकडून खरेदी केली असून खरेदीखतानंतर ताबाही दिलेला आहे. प्रतिवादी क्र.९ याने सदर जमीनी खरेदी केल्यानंतर वादींनी त्या खरेदीखताबाबत महसूल कार्यालयात कुठल्याही प्रकारे फेरला आक्षेप घेतलेला नाही. त्यामुळे कायदेशीररीत्या ७/१२ उताऱ्यावर त्याच्या नावाची नोंद करण्यात आली. वादी यांनी शेतजमीनीचे भाव वाढल्यामुळे मुद्दामहून आकसापोटी बनावट दावा दाखल केला. वादी व प्रतिवादी यांच्या देविदास गिरजुबा डोंगरे यांच्या हयातीत वाटण्या झालेल्या आहेत. त्यामुळे त्याचा मौजे बाजीउम्रद येथील गट क्र.२९१ मधील क्षेत्र ८१ शेतजमीनीचे कुठलाही संबंध नाही. त्यामुळे वादीचा दावा हा खर्चासह फेटाळण्यात यावा अशी विनंती केली.

५) वादींतर्फे त्यांचे विधिज्ञ श्री. पी. डब्ल्यू. कुलकर्णी यांचा तोंडी युक्तीवाद ऐकला. प्रतिवादी क्र.९ तर्फे युक्तीवादासाठी कुणीही हजर झाले नाही.

६) अर्ज व त्यावरील म्हणणेवरुन खालील मुद्दे उपस्थित होतात. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिमांसेसह विवेचन करीत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १ | वादींनी त्यांच्या अर्जातील कथने सकृतदर्शनी असल्याचे सिध्द केले आहेत काय ? | – | होकारार्थी |
| २ | अनुकूलतेचा कल वादींच्या बाजुने झुकत असल्याचे वादी सिध्द करतात काय ? | – | होकारार्थी |
| ३ | मनाई हुकुम मिळाला नाही तर वादींचे अपरिमित नुकसान होईल हे वादीं सिध्द करतात काय ? | – | होकारार्थी |
| ४ | अंतिम आदेश काय ? | – | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

७) वादींनी त्यांच्या कथनाच्या समर्थनार्थ कागदपत्रांची सुची निशाणी क्र.७० अन्वये मौजे बाजीउम्रद ता. जि. जालना येथील गट क्र.२९१ चा ७/१२ उतारा व फेरफार क्र.२६६१ ची प्रत दाखल केलेली असून वादीचे शपथपत्र निशाणी क्र.६८ वर दाखल केले आहे. प्रतिवादी क्र.९ तर्फे काही एक कागदपत्रे दाखल केलेली नाही.

**मुद्दे क्र.१ ते ३ करीताः**

मुद्दे क्रमांक १ ते ३ एकमेकांशी निगडीत असल्याने चर्चेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी कारणमिमांसा एकत्रित विचारात घेण्यात येत आहे.

८) वादींच्या विधिज्ञांनी युक्तीवादामध्ये कथन केले की, प्रस्तुतचा दावा प्रलंबित असताना मुळ प्रतिवादी क्र.६ हिने दावा मिळकत गट क्र.३०३ चे हस्तांतर केले असून तिने

परत दिनांक २०/०१/२०१७ रोजी प्रतिवादी क्र.९ च्या नावाने दुसरी मिळकत गट क्र.२९१ मधील ८१ आर क्षेत्र विक्री केली आहे. प्रतिवादी क्र.६ ला तिच्याविरुध्द प्राप्त झालेला तात्पुरता मनाई हुकुम अर्ज निशाणी क्र.५ व ३६ वरील आदेशाची माहिती असताना देखिल सदर खरेदीखत तिने करुन दिले आहे. त्या आधारे प्रतिवादी क्र.९ चे नाव हे महसूल दप्तरी लागले, त्याचा फायदा घेवून प्रतिवादी क्र.९ ने दावा मिळकत विक्री केल्यास दाव्यामध्ये गुंतागंत निर्माण होईल. तरी न्यायाच्या दृष्टीने प्रतिवादी क्र.९ विरुध्द तात्पुरता मनाई हुकूमाचा आदेश पारीत करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

९) मा. सर्वोच्च न्यायालय व मा. मुंबई उच्च न्यायालय यांच्या अगणीत न्यायनिर्णयानुसार तात्पुरता मनाई हुकुम आदेश मिळणेसाठी पक्षकाराने सकृतदर्शनी प्रकरण सिध्द केले आहे काय ? तसेच अर्जाचा अनुकुलतेचा कल त्याच्या बाजूने असून तात्पुरता मनाई हुकुम आदेश त्यांच्या हक्कात न दिल्यास त्यांची अपरिमित हानी होईल काय ? या तीन बाबी सिध्द करणे आवश्यक आहे. तसेच, अर्ज निकाली काढतांना अभिलेखावर दाखल केलेले कागदपत्रे व शपथपत्रे विचारात घेण्यात येतात. परंतु त्यासाठी त्यांची सखोल छाननी करणे आवश्यक नाही. या प्रस्थापित तत्वाच्या अनुषंगाने परिस्थितीवरून वादांशी निगडीत असलेल्या बाबी व परिस्थिती यांची शहानिशा करणे आवश्यक आहे.

१०) अभिलेखाची पडताळणी केली असता, वादींनी वाद मिळकत गट क्र.३०३ व २९१ संदर्भात वारसाहक्क आधारे वादी कायदेशीर मालक व ताबेदार आहे अशी उद्घोषणा मिळणेसाठी व प्रतिवादी क्र.६ हिचा कोणताही कायदेशीर हक्क नाही अशी घोषणा करुन मिळणेसाठी तसेच, महसूल दप्तरी असलेल्या नोंदीबाबत बेकायदेशीर असून बंधनकारक नाही असे घोषित करणेसाठी व इतर मागण्यासाठी दावा दाखल केलेला आहे. वादींतर्फे दाखल

तात्पुरता मनाई हुकुम आदेश निशाणी क्र.०५ व ३६ वर दिनांक २०/०८/२०१५ रोजी आदेश पारीत होवून प्रतिवादी क्र.१ ते ८ ने वादींच्या दावा मिळकतीवरील कब्जेवहीवाटीस पुढील आदेश होईपर्यंत अडी– अडथळा करु नये, तसेच, प्रतिवादी क्र.८ ने दाव्याचा निकाल लागेपावेतो दावा मिळकतीतील जमीन कोणत्याही माध्यमाने हस्तांतरीत करु नये, असा तात्पुरता मनाई हुकूमाचा आदेश पारीत करण्यात आला. प्रतिवादी क्र.६ हिने वाद मिळकत गट क्र.२९१ मधील ८१ आर क्षेत्र नोंदणीकृत खरेदीखता आधारे दिनांक २०/०१/२०१७ रोजी रक्कम रु.३,८०,०००/– विक्री केल्याचे अभिलेखावरील ७/१२ उतारा व फेरफार क्र.२६६१ वरील नोंदीवरुन दिसून येते व सदर खरेदीखताआधारे प्रतिवादी क्र.९ च्या नावे फेरफार क्र.२६६१ दिनांक २१/०२/२०१७ मंजूर झाला व त्याआधारे प्रतिवादी क्र.९ चे नाव ७/१२ उताऱ्याचे भोगवटदाराच्या सदरी लागल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. सदर महसूल नोंदीआधारे सदर जमीनीचे हस्तांतर प्रतिवादी क्र.९ याने करण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर जमीनीचे हस्तांतर झाल्यास दावामधील गुंतागुंत वाढेल. तसेच, बहू दाव्याची निर्मीती होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे दाव्याचा गुणवत्तेवर अंतिम निकाल होईंपर्यंत प्रतिवादी क्र.९ ने सदर मिळकतीचे कोणत्याही प्रकारे हस्तांतर करु नये, अशा आशयाचा तात्पुरता मनाई हुकूम प्रतिवादी क्र.९ यांच्याविरुध्द पारीत करणे न्यायाचित ठरेल.

११) उपरोक्त चर्चेवरुन वादींनी सकृतदर्शनी त्यांचे कथन सिध्द केले असून अर्ज नामंजूर केल्यास वादींचे अपरिमित नुकसान होईल व बहू दाव्याची संख्या वाढेल यांची शक्यता नाकारता येणार नाही. याउलट प्रतिवादी क्र.९ यांच्याविरुध्द अर्ज मंजूर केल्यास त्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. करीता या सर्व बाबीं लक्षात घेता वादींचा तुर्तातुर्त

मनाई हुकूमाचा अर्ज मंजूर करणे उचीत ठरेल. त्यामुळे मुद्दे क्र.१ ते ३ चे उत्तर होकारार्थी नोंदविण्यत येवून मुद्दा क्र.१ च्या उत्तरादाखल खाालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१) वादींचा प्रस्तुतचा अर्ज निशाणी क्र.६७ मंजूर करण्यात येतो.

२) प्रतिवादी क्र.९ ने स्वतः अथवा इतर कोणामार्फत दाव्याचा निकाल लागपर्यंत दावा मिळकतीमधील शेतजमीन कोणत्याही माध्यमाने हस्तांतरीत करु नये असा तात्पुरता मनाई हुकुमाचा आदेश पारीत करण्यात येतो.

३) अर्जाचा खर्चाचा विचार अंतिम न्यायनिर्णयाचे वेळी करण्यात येईल.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by KULKARNI MADHURI SUDHAKAR
Date: 2022.01.14 16:52:21 +0530

( **माधुरी एस. कुलकर्णी**)

दिनांकः १२/०१/२०२२ दिवाणी न्यायाधीश (व.स्तर)

जालना

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्रा प्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव : एम. डी. आढे

न्यायालयाचे नाव : दिवाणी न्यायालय (व.स्तर), जालना

दिनांक : १४/०१/२०२२

सही/-

एम. डी. आढे

लघुलेखक (नि. श्रे.)